# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र १२५** **दिनांक- १३/०५/२०२१**

**वालीव पोलीस ठाण्यात मनुष्य मिसींग नंबर ११६/२०२१ चा काही तासात शोध घेवून हरविलेला इसम कोविड उपचारादरम्यान मयत झालेचे निष्पन्न.**

वालीव पोलीस ठाणे येथे खबर देणार अनिकेत गोराचंद मुखर्जी वय - ३३ वर्षे व्यवसाय नोकरी रा रुमनं. १०१,जनपद शॉपींग सेंटर, व्ही व्ही एम सी बिल्डींग, वसई (प) यांनी मनुष्य मिसींग खबर दिली की, वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीत वरुण कोवीड सेंटर असुन सदर कोवीड सेंटरमध्ये कोरोना बाधीत श्री रामचंद्र दास वय – ८२ वर्ष हे दिनांक २२.०४.२०२१ रोजी पासुन उपचार घेत होते. त्यांचे नातेवाईक त्यांना घेण्यासाठी गेले असता त्यांना सदरचे रुग्ण काही दिवसांपासुन गायब (मिसींग) असल्याची माहीती प्राप्त झाली.

त्यानुसार वालीव पोलीस ठाण्यात मनुष्य मिसींग नंबर ११६/२०२१ अन्वये दिनांक १२.०५.२०२१ रोजी १६.४८ वा दाखल करण्यात आली असुन सदर मिसींगचा तपास पोलीस निरीक्षक श्री राहुलकुमार पाटील हे करीत आहेत.

सदर घटनेच्या अनुषंगाने सखोल चौकशी करता, श्री रामचंद्र दास वय ८२ वर्षे हे कोवीड रुग्ण वरुण कोवीड सेंटरमधुन मिसींग अगर बेपत्ता झालेले नसुन त्यांना वरुण कोवीड सेंटरमधील डॉक्टरांनी पुढील उपचाराकरीता अनोळखी इसमाचे नावाने दिनांक २६.०४.२०२१ रोजी रात्रौ विजयनगर तुळींज हॉस्पीटल येथे दाखल केले होते. रुग्णाचे कोणतेही नातेवाईक उपलब्ध नसल्यामुळे तसेच त्यांचे कोणतेही ओळखपत्र नसल्यामुळे व त्यास त्वरीत अधिक चांगले उपचार मिळावेत म्हणुन त्यास ट्रान्सफर करताना अनोळखी इसम असे नमुद करुन ट्रान्सफर केले होते. ते उपचार चालु असताना मयत झाल्याचे निष्पन्न झालेले आहे.

सदरचा पुढील सखोल तपास श्री.संजयकुमार पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, श्री.अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विलास चौगुले यांचे सुचनांप्रमाणे पोनिरी श्री राहुलकुमार पाटील,व गुन्हे प्रकटीकरण पथक वालीव पोलीस ठाणे हे करत आहेत

Scanned with CamScanner